
THANE POLICE
COMMISSIONERATE
#ExcellentDetection
#HugePropertyseizure

THANE CITY
Safe Thane Secure Thane

# ❖ प्रेस नोट ❖

दिनांक २०/०१/२०२१

**''परदेशात पाठविण्यात येणाऱ्या सिलबंद कंटेनरमधील चोरी/अपहार केलेल्या २ गुन्हयातील एकुण १,९२,००,८७०/- रूपये किंमतीचा बेडशिट सेटचे कार्टन हस्तगत''**

---

फिर्यादी श्री. भरत श्याम मेहरोत्रा, राह. ठाणे (प) यांची 'NMK TEXTILE MILLS' नावाची बेडशिट बनविण्याची कंपनी श्री अरीहंत कंम्पाउंड, काल्हेर, ता.भिवंडी जि. ठाणे या ठिकाणी आहे. फिर्यादी यांचे कंपनीला COLONY BRANDS INC, CHICAGO तसेच HUDSONS BAY COMPANY ULC, CANADA या कंपन्यांकडून बेडशिट मालाची ऑर्डर मिळाली होती. त्याप्रमाणे फिर्यादी यांनी मिळालेल्या ऑर्डरप्रमाणे माल तयार करून सदरचा माल न्हावाशेवा पोर्ट येथे पाठविणेकरीता ''सी बर्ड एजन्सी'' मार्फत ''ओमसाई लॉजीस्टीक'' यांचेकडील ट्रेलरद्वारे सिलबंद कंटेनरमध्ये भरून दिनांक २०/१०/२०२० रोजी व दि. २७/१०/२०२० रोजी पाठविला. सदरचा कंटेनर परदेशातील संबंधित कंपन्यांकडे पोहचल्यावर तपासले असता दोन्ही सिलबंद कंटेनरमधून एकुण १,२६,९९,८०९/- रू. किं. चे बेडशिट सेटस् चोरी/अपहार झाल्याचे माहिती मिळाल्याने फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून नारपोली पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं. ६४९/२०२० भा.दं.वि.सं. कलम ४०७,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

---

फिर्यादी श्री. सचिन सज्जन झुनझुनवाला, रा. अंधेरी (प.) मुंबई यांची ''ग्लोब कॉटयार्न प्रा. लि. नावाची बेडशिट बनविण्याची कंपनीने ELITE HOME PRODUCTS, USA .या कंपनीकडून बेडशिट मालाची ऑर्डर मिळाली होती. त्याप्रमाणे फिर्यादी यांनी मिळालेल्या ऑर्डरप्रमाणे माल तयार करून सदरचा माल न्हावाशेवा पोर्ट येथे पाठविणेकरीता ''सी बर्ड एजन्सी'' मार्फत ''ओमसाई लॉजीस्टीक'' यांचेकडील ट्रेलरद्वारे सिलबंद कंटेनरमध्ये भरून दिनांक दि. १०/११/२०२० रोजी पाठविला. सदरचा कंटेनर परदेशातील संबंधित कंपनीकडे पोहचल्यावर तपासले असता सिलबंद कंटेनरमधून एकुण १,१५,००,०००/- रू. किं. चा (टॅक्स वगळुन ७०,१३,४२३/- किं. चा) बेडशिट सेटस् चोरी/अपहार झाल्याचे माहिती मिळाल्याने फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून नारपोली पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं. ६६६/२०२० भा.दं.वि.सं. कलम ४०७,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

---

परदेशात पाठविलेल्या मालाचा आरोपीतांनी अपहार केल्याने भारत देशाची प्रतिमा मलीन झाल्याने लागलीच सदर गुन्हयाचा तपास प्रशांत ढोले, सहाय्यक पोलीस आयुक्त, पूर्व विभाग भिवंडी यांनी करणेबाबत वरिष्ठांचे आदेश झाले. सदर दोन्ही गुन्हयांमधील आरोपींचा शोध घेणेकामी मोबाईल सी.डी.आर., डम डाटा व जी.पी.एस. द्वारे तांत्रिक तपास करणे आवश्यक असल्याने गुन्हयांचे तपासकामी सहाय्यक तपासी अधिकारी म्हणुन सपोनिरी. के.जे. टोकले, नेम. शांतीनगर पो.स्टे. तसेच पोउपनिरी. पुष्पराज सुर्वे, नेम. नारपोली पो.स्टे. यांचे दोन स्वतंत्र तपास पथक नेमण्यात आले. पोउपनिरी. सुर्वे यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे तसेच तांत्रिक विश्लेषणात प्राप्त मोबाईल नंबर वरून आरोपीत नामे १) सर्फराज मोहम्मद युनूस अन्सारी, वय ४५ वर्षे, रा.बि/१२, रूम नंबर ४०२, नटवर पारेख कंम्पाउंड, जी.एम. लिंक रोड, गोवंडी, प. मुंबई -४३ मुळ पत्ता-मोहल्ला अंन्सारीयन, एक मिनार मश्जिद, किरतपुर, थाना-किरतपुर, जिल्हा-बिजनोर, राज्य-उत्तर प्रदेश २) मोहम्मद फारूक मोहम्मद यासीन कुरेशी, वय ४६ वर्षे, रा.बि/१२, रूम नंबर ४०९ , नटवर पारेख कंम्पाउंड, जी.एम. लिंक रोड, गोवंडी, प.मुंबई -४३, मुळ पत्ता-रायबरेली, राज्य-उत्तरप्रदेश ३) मोहम्मद रिहान मोहम्मद नबी कुरेशी, वय २९ वर्षे, रा. जामा मश्जीद मोहल्ला, ग्राम भोजपुर, ता. था गुरूव्दारा, जि. मुरादाबाद, राज्य उत्तरप्रदेश. ४) मोहम्मद मुल्तजीम मोहम्मद हजिम कुरेशी, वय ३० वर्षे, रा. जामा मश्जीद मोहल्ला, ग्राम भोजपुर, ता. था गुरूव्दारा, जि. मुरादाबाद, राज्य उत्तरप्रदेश यांना अटक करण्यात आली.

अटक आरोपीतांकडून वसई येथून नारपोली पो.स्टे. गु.र.नं. ६६६/२०२० मधील चोरीस गेलेल्या मालापैकी एकुण १,१४,१९,८२०/– रू. किं. चा (टॅक्स वगळुन ६९,६१,५२४/– किं. चा)रू. किं. चे बेडशिटचा माल जप्त करण्यात आला. तर एक पथक उत्तर प्रदेश येथे पाठवुन आरोपीतांनी दिलेली माहिती, तांत्रिक विश्लेषण तसेच उत्तर प्रदेश येथे गुप्त माहिती मिळवुन सुबोधनगर, अमरोहा, राज्य – उत्तर प्रदेश येथून नारपोली पो.स्टे. गु.र.नं. ६४९/२०२० मधील चोरी/अपहार केलेल्या मालापैकी एकुण ७७,८१,०५०/– रूपये किंमतीचा बेडशिटचा माल हस्तगत केला. अशाप्रकारे जगभरात चालू असलेल्या कोरोना आजारामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामात परदेशात माल निर्यात करणारे भारतीय व्यापाऱ्यांची मलीन झालेली प्रतिमा उंचावुन नमुदचे २ गुन्हे उघडकीस आणुन एकुण १,९२,००,८७०/– रू. किं. चा बेडशिटचा माल हस्तगत करण्यात आला आहे. सद्या आरोपीत पोलीस कोठडीत असुन त्यांनी अशा प्रकारचे इतर गुन्हे केले असल्याची माहिती मिळत असुन त्यांचेकडून इतर गुन्हे देखील उघड होण्याची शक्यता आहे. गुन्हयाचा अधिक तपास सुरू आहे.

नमुदची कामगिरी मा.पोलीस आयुक्त सो. श्री.विवेक फणसळकर, ठाणे शहर, मा.सह पोलीस आयुक्त सो. श्री.सुरेश मेकला, ठाणे शहर. मा.अपर पोलीस आयुक्त सो. श्री. अनिल कुंभारे, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर, मा.पोलीस उपायुक्त सो.परिमंडळ –२, भिवंडी श्री. योगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस आयुक्त पुर्व विभाग, भिवंडी श्री.प्रशांत ढोले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मालोजी शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक के.जे. टोकले, नेम. शांतीनगर पो.स्टे., पोलीस उप निरीक्षक पुष्पराज सुर्वे, पोहवा/२०३९ बोडके, पोना/४३५५ गावडे, पोना/४९६८ सहारे, पोशि/५७३२ शिंदे, पोशि/३१४१ सोनावणे, पोशि/२६४२ बाविस्कर, पोशि/४३३९ जाधव, पोशि/२४६८ विजय ताठे (मा.पोलीस उपायुक्त, परि.२ भिवंडी कार्यालय), तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त, पूर्व विभाग भिवंडी कार्यालयातील पोहवा/६०३३ सागरे, पोहवा/३९४६ घरत, पोना/४६८२ बांदल, पोना/११५७ चौधरी, पोना/५९५० संतोष जाधव, पोना/६३६५ पांडुरंग जाधव यांनी केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास श्री. प्रशांत ढोले, सहा. पोलीस आयुक्त, पूर्व विभाग भिवंडी हे करीत आहेत.